भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ११४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०२/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेवुन तिचेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०२/२०१७ चे २२.००वा ते दिनांक १६/०२/२०१७ चे ०७.०० वा. पर्यत. यातील फिर्यादी मुलीला तुझ्या मित्राने यात्रेला जाण्याकरीता बोलवत आहे. असे आरोपी क्र. १ ने सांगुन आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन पिडीत फिर्यादी ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा तीला जिप मध्ये बसवुन पळवुन नेले व आरोपी क्र. १ नी मित्राचे घरी नेवुन तिच्यावर जबरी अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३,३७६(१)(२)(आय),३४ भांदवी. सहकलम ४,८ बाल लैगिक अधिनियम संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०२/२०१७ चे ०९.०० ते १७.०० वा. दरम्यान. यातील आरोपी हा फिर्यादीचे सासुचे घरी पाहुणा म्हणुन आला व फियादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष, हीला लग्नाचे आमीष दाखवुन फियादीचे कायदेशीर छपरीतुन पळवुन नेले असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व शाळेचे बोनाफाईट सर्टीफीकेट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :—**

दिनांक १५/०२/२०१७ चे २१.४५ ते २२.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी मयुर प्रेमलाल टेंभुरकर वय २५ वर्ष, रा. नाशीक नगर भंडारा हा मेंढा रिंग रोड ने आपली सायकल हातात धरुन पायी —पायी शास्त्री चौका कडे जात असतांना त्याच दिशेने मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी होंडा ऍक्टीवा चालकाने आपल्या ताब्यातील दुचाकी वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीला मागेहुन दसरा मैदान रिंग रोड पाण्याचे टाकी जवळ येथे धडक देवुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) संशयीत आरोपीने कुंडयातील पाण्यात विषारी औषध घालुन जनावरांना जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १५/०२/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी खुशाल उरकुडा मते वय ३६ वर्ष रा. खोकरला याने आपली जनावरे कुंडयातील पाणी पाजण्याकरीता आणले होते कुंडयातील विषारी औषधाचे पाणी फिर्यादीचे तिन म्हशी ने पिऊन त्यांना विषबाधा झाल्याने संशईत आरोपी हीने कुंडयामध्ये विषारी औषध घालुन जनावरे जिवाने मारण्याचा प्रयत्न केले असल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९,५११ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक १६/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०७ लिटर हातभट्टी दारु किंमत्री ४९०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.